


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २१४, बुधवार ८ मे २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

## संतुष्टीकरण आणि तृष्टीणादरम्याची ही निवडणूक

### ■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन ■ नगर येथे डॉ. सुजय विखे, सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ सभा




■ डॉ. सुजय विखे व सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ नगर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा पार पडली.

**नगर : प्रतिनिधी**

**निवडणूकीपूर्वी जो भानुमतीचा कुणबा एकत्र आला होता हा कुणबा ४ जुननंतर वाळूच्या किल्ल्याप्रमाणे कोसळणार असल्याचे सांगतानाच यावेळीची निवडणूक ही संतुष्टीकरण आणि तृष्टीकरण यादरम्यान होत असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.**

नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील भाजपाचे उमेदवार डॉ. सुजय विखे पाटील व शिर्डी लोकसभा मतदारसंघातील शिवसेनेचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारार्थ मोदी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी उपस्थित जनसमुदायाला संबोधित केले. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राधाकृष्ण विखे, डॉ.सुजय विखे, सदाशिव लोखंडे, प्रा. राम शिंदे, मोनिका राजळे, शालीनी विखे यांच्यासह अनेक मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

श्रध्दा आणि सबुरीचा मंत्र ज्यांनी दिला त्या साईबाबांच्या चरणी नतमस्तक होतो, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनाही मी कोटी कोटी अभिवादन करतो असे म्हणत मोदी यांनी आपल्या भाषणाला मराठीतून सुरूवात केली. ते म्हणाले, एडीए मेहनतीच्या माध्यमातून संतुष्टीकरण करण्याचा प्रयत्न करीत आहे तर इंडिया आघाडीचे नेते तृष्टीकरणचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप त्यांनी केला.

मोदी पुढे म्हणाले, काँग्रेस आणि त्यांचे सहकारी खतरनाक खेळ खेळत असल्याचे मी अनेक दिवसांपासून सांगत होतो. आता इंडिया आघाडीच्या एका मोठया नेत्याने या खतरनाक खेळावरून पडदा काढला आहे. लालूप्रसाद यादव हा तो नेता असून ते आताच तुरूंगातून बाहेर आले आहेत. देशात इंडिया आघाडीचे सरकार आले तर मुस्लिमांना आरक्षण देणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. इतकेच नव्हे तर ते मुस्लिमांना पूर्ण आरक्षण देणार असल्याचे सांगतानाच वास्तविक देशात एससी, एनटी, ओबीसी या समाजाकडे पुर्ण आरक्षण आहे. त्यामुळे इंडिया आघाडी हे पूर्ण आरक्षण काढून मुस्लिम समाजाला देणार असल्याचे ते सांगत असल्याचे मोदी म्हणाले. या माध्यमातून स्वतःच्या मतदारांना खुश करण्याचे काम इंडिया आघाडी करत असल्याचे ते म्हणाले. जे काम करण्यापासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी थांबविले होते तेच काम त्यांना करायचे आहे. धर्माच्या अधारावर आरक्षण देण्यास संविधानाने मनाई केली आहे. तरी देखील ते संविधान बदलायचे असल्यामुळेच अशा पध्दतीने आरक्षण देण्याची भाष करीत असल्याचा आरोप मोदी यांनी केला.

काँग्रेस पक्षाने जाहिर केलेला जाहिनामा हा पुर्णपणे मुस्लिम लीगचा जाहीरनामा असल्याचा दावा करत भारतीय जनता पक्ष आणि एनडीएतील घटक पक्षातील जाहिरनाम्यात कोणते मुद्दे आले आहेत ते म्हणजे विकास, गरीब कल्याण, राष्ट्रीय सुरक्षा, देशाचा स्वाभिमान, देशाचा सन्मान हे मुद्दे आहेत. या मुद्यांवर काँग्रेस बोलत नसल्याचा आरोप मोदींनी केला.

काँग्रेसने ५० वर्षे गरीबी हटविण्याचे खोटे आश्वासन दिले. गरीबांसोबत काँग्रेसने सर्वात मोठा विश्वासघात केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ज्याला विरोध केला त्या जाती आधारीत आरक्षण देण्याची भाषा काँग्रेस करीत असल्याचा दावा मोदी यांनी यावेळी केला.

## लक्ष्मीदर्शन सुरू झालंय, तिच्याकडे पाठ फिरवू नका !

### नीलेश लंके यांची राहुरी येथे सभा

**राहुरी : प्रतिनिधी**

**मतदारसंघात लक्ष्मीदर्शन सुरू झाले आहे. लक्ष्मीकडे पाठ करू नका. गरीबाघरचं लग्न नाही. तिकडून घ्या, राहिलं थोडं फार तर माझ्याकडेही पाठवा. मत मात्र तुतारीलाच द्या असे सांगत आ. नीलेश लंके यांनी विरोधकांवर हल्लाबोल केला.**

लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रचार सभेत लंके हे बोलत होते. यावेळी आ. प्राजक्त तनपुरे, बाजार समितीचे सभापती अरूण तनपुरे, हर्ष तनपुरे, नितेश कराळे, शहराध्यक्ष संतोष आघाव, सुर्यकांत भुजाडी, शिवसेनेचे सचिन म्हसे, बाळासाहेब आढाव, सर्व सेवा संस्थांचे संचालक, सर्व नगरसेवक यांच्यासह मोठया संख्येने नागरीक यावेळी उपस्थित होते.

लंके म्हणाले, ज्यांना पाच वर्षापूर्वी आपण संसदेत पाठविले त्यांनी काय दिवे लावले ? शेतकऱ्याचा, समाजहिताचा एकही प्रश्न त्यांनी संसदेत मांडला नाही. मतदारसंघातील विकास कामेही केली नाहीत. दुसऱ्याच्या झेंडयावर पंढरपूर करण्याची त्यांना सवय आहे. दुसऱ्याने मंजुर केलेल्या कामाचे भुमिपुजन करण्याचे उद्योग ते करत असल्याचा आरोप लंके यांनी केला.

लंके म्हणाले, निवडणूकीला समोरे जाताना त्यांनी विकासाच्या मुद्यावर बोलले पाहिजे. मात्र भाजपाच्या निष्क्रीय खासदारांच्या यादीत त्यांचे नाव आहे. जनतेमध्ये कसे जायचे हा प्रश्न निर्माण झाल्यानंतर त्यांच्यावर दाळ, साखर वाटण्याची वेळ आली. नगर-मनमाड रस्ता त्यांना करता आला का ? काम सांगण्यासाठी ते व्यक्तीगत टिका टिपन्नी करतात. माझं नातं शेतकऱ्यांशी, गोरगरीबांशी आहे, त्यांच्या न्याय्य हक्कासाठी २४ तास काम करण्याचा शब्द देतो अशी ग्वाही लंके यांनी दिली.



■ नीलेश लंके यांच्या प्रचारार्थ राहुरी येथे जाहिर सभा पार पडली.

### मोदींनी किडण्याच विकायच्या ठेवल्या आहेत

मोदींनी बंदा देश विकायला काढला असून आता त्यांनी तुमच्या किडण्याच विकायच्या ठेवल्या आहेत. आपण एका अशिक्षीत माणसाला पंतप्रधानपदाच्या खुर्चीवर बसविल्यापासून ते थापा मारण्यापलीकडे काहीही करत नसल्याचे नीतेश कराळे यांनी सांगितले. २०१४ मध्ये त्यांनी महागाईच्या विषयावर मते मागून सत्ता मिळविली. दहा वर्षानंतर महागाईची काय स्थिती आहे. महागाई पाहता मोदी सरकार हद्दपार करण्याची वेळ आली आहे.

### मोदी प्रसिध्दीसाठी हपापलेले

मोदी अहंकारी आहेत. प्रसिध्दीसाठी हपापलेले आहेत. कोरोना लस घेतल्यानंतरच्या प्रमाणपत्रावर मोदींचा फोटो, पेट्रोल पंपावर फोटो, मृत्यू प्रमाणपत्रावर फोटो, जनतेच्या पार्श्वभागावर फोटो लावायचे राहिलेत. रेल्वे प्लॅटफॉर्मवर प्रत्येकी सव्वा सहा लाख रूपये खर्चून मोदींनी सेल्फी पॉईंट काढले आहेत. दुसरीकडे ते स्वतःला फकीर म्हणून घेतात. आता त्यांनी जनतेच्या गळयात एखादी झोळी टाकून फकीर करावं अशी उपहासात्मक टीका नीतेश कराळे यांनी यावेळी केली.

### कोरोना काळात लंके एकटेच मैदानात

गोरगरीबाचं पोरग पुढे आणण्याचं काम शरद पवार यांनी केले आहे. गोरगरीबांचा, जनसामान्यांचा उमेदवार नीलेश लंके आहे. कोरोना संकटात सगळे घरात बसून होते त्यावेळी हा एकटाच माणूस मैदानात उतरून कोरोनाच्या विरोधात लढत होता. तुम्हाला लंके यांना निवडूण द्यावेच लागेल. विखे यांच्या घरात पन्नास वर्षांपासून सत्ता आहे. मागचे पाच वर्षे ते खासदार होते. नगर-मनमाड महामार्गावर ४०० ते ५०० लोकांची बळी गेले. खड्डयात वाहने अदळल्याने अनेकजण जायबंदी झाले मात्र या रस्त्याचे काम त्यांना करता आले नसल्याचे नीतेश कराळे यांनी सांगितले.

### दिल्लीत जाऊन मुजरा करणारा खासदार हवा का ?

आरडगांव येथे प्रचारानिमित्त गेलो होतो. काही तरूण दुध उत्पादक शेतकऱ्यांनी भाजपामधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांच्या संवेदना ऐकूण माझ्या डोळयातून पाणी आले. भारतीय जनता पक्षाला मतदान करणारे ते तरूण होते. दुध दर कमी झाल्याने दिड लाखांची गाय पन्नास हजार रूपयांना विकली जात आहे. शेतकरी ढसढसा रडतोय, सरकार मात्र त्याकडे लक्ष देण्यास तयार नाही. आपले खासदार मात्र त्याकडे लक्ष देत नाहीत. दिल्लीला जाऊन मुजरा करतात. दिल्लीपुढे न झुकता स्वाभिमानाने प्रश्न मांडणारा खासदार हवा की मुजरा करणारा खासदार हवा ? अशी टीका आ. तनपुरे यांनी केली.

### माजी खासदार सुजय विखे !

**आ. प्राजक्त तनपुरे म्हणाले सुजय विखे यांना विद्यमान नव्हे तर माजी खासदार म्हणले तरी चालेल कारण मतदारसंघात तशी परिस्थिती दिसत आहे. तर नीलेश लंके यांना भावी खासदार म्हटले तरी वावगे ठरणार नाही.**

### केंद्र व राज्यातील सरकार बदलण्याची वेळी

कांदा निर्यातबंदीबाबत विखे यांनी चेष्ट चालविली आहे. महिनाभर लपाछपी सुरू होती. कांदा उत्पादक मतदारसंघात मतदान आहे म्हणून आता निर्यातबंदी उठविल्याचे सांगितले जात आहे. मुळात कांदा निर्यातीवर बंद आणलीच कशाला ? ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वी कांदा विकला त्याचा काय हिशेब आहे ? आता ग्रामीण भागाप्रती संवदेना नसणाऱ्या सरकारला घरी बसविण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ज्या गोष्टींवर चालते त्यालाच हे सरकार लाथडत असेल तर बाकी सर्व मुददे गौण आहेत. ज्यावेळी आमच्या पोटाचा प्रश्न येतो त्यावेळी हे देशातील आणि राज्यातील सरकार बदलण्याची वेळ आली आहे, असे तनपुरे म्हणाले.

### खासदार गावात आलेच नाहीत

आपला ग्रामीण भाग असून या भागाच्या संवेदना, अडीअडचणी जाणून घेणारा माणूस संसदेमध्ये त्या मांडू शकतो. जो माणूस पाच वर्षात आपल्याकडे आलाच नाही. लोकही म्हणतात खासदार आमच्याकडे आलेच नाहीत. तुम्ही सर्वसामान्यांमध्ये गेलेच नाहीत त्यांच्या सुख,दुःखात सामील झाले नाही तर तुम्हाला त्यांचे दुःख कसे कळणार ? ते संसदेत काय मांडणार ? असा सवाल आ. तनपुरे यांनी केला.

## ग्रामपंचायतप्रमाणे निवडणूक लढवा!

### नीलेश लंके यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**चिचोंडी पाटील : प्रतिनिधी**

**येत्या १३ तारखेला होणारी लोकसभेची निवडणूक कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायत निवडणूकीप्रमाणे लढवावी. आपल्याला मोठया मताधिक्क्याने विजय संपादन करायचा असल्याचे आ. नीलेश लंके यांनी सांगितले.**

आ. लंके यांच्या प्रचारार्थ चिचोंडी पाटील येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत लंके हे बोलत होते. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, मा. आमदार साहेबराव दरेकर, घनश्याम शेलार, बाबासाहेब गुंजाळ, संदेश कार्ले, बाळासाहेब हराळ, शरद झोडगे, गोविंद मोकाते, शौकत तांबोळी, राजेंद्र भगत, रोहिदास कर्डीले, अरूण म्हस्के, राजेश



परकाळे, विद्याताई गाडेकर, आबासाहेब कोकाटे, अप्पासाहेब पवार, शंकरराव पवार, महादेव खडके, ययाती फिसके, दिलीप पवार, शरद गुंजाळ, प्रविण कोकाटे यांच्यासह यावेळी मोठया संख्येने नागरीक उपस्थित होते.

यावेळी बोलताना लंके म्हणाले, धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी ही निवडणूक असून ही निवडणूक जनतेनेच हाती घेतलेली आहे. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मताधिक्क्यासाठी चढाओढ सुरू असून विरोधकांनी शिर्षस्थ नेत्यांच्या कितीही सभा घेतल्या तरी ते आपला विजय रोखू शकत उर्वरीत पान ३ वर

## भाळवणीत बर्निंग कारचा थरार !

### ■ झाडाला धडकून मारूती कार पेटली ■ तीन मुले व एक मुलगी बालंबाल बचावले




**भाळवणी : प्रतिनिधी**

**भाळवणी-जामगांव रस्त्यावर भाळवणीपासून एक किलोमिटर अंतरावर एका विना क्रमांकाच्या मारूती कारची झाडाला धडक बसून तीने पेट घेतला. मंगळवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या दुर्घटनेत तीन तरूण व एक तरूणी बचावले.**

भाळवणी सबस्टेशन जवळ घडलेल्या या घटनेत ही मारूती कार भाळवणीहून जामगांवच्या दिशेने जात होती. सबस्टेशनजवळ आल्यानंतर कारने रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाला धडक दिली व साईड गटरमध्ये पलटी झाली. व काही वेळातच गाडीने पेट घेतला. दरम्यानच्या काळात या कारमध्ये असलेले तीन तरूण व एक तरूणी उर्वरीत पान ३ वर




| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |



फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

# गरोदर असताना महिलांनी प्रवास करणं कितपत योग्य?

**गरोदर असताना प्रवास करणे हा एक सुंदर अनुभव असू शकतो. ज्यामुळे गर्भवती मातांना बाळाच्या जन्मापूर्वी आराम करण्याची संधी मिळते. सहलीचे आयोजन करताना, काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे, सुरक्षितता आणि आराम प्रथम ठेवणे आवश्यक आहे. गरोदर महिलांनी अशावेळी कोणती काळजी घ्यावी याचा सल्ला डॉक्टरांकडून देण्यात आला आहे...**



- दुसऱ्या तिमाहीत प्रवास करणे सुखाचे : गर्भधारणा हा काही आजार नाही; आपण एका जीवनाला जन्म देणार आहात हे जाणून घेणे ही सर्वात सुंदर भावना आहे. म्हणून, तुम्ही गरोदर असताना प्रवास करू शकता जोपर्यंत तुम्ही सुरक्षितपणे प्रवास करत आहात. कारण तोपर्यंत काहीच त्रास नाही. सर्वसाधारणपणे, जर तुम्ही गरोदर असाल आणि तुमच्या गरोदरपणात कोणतीही गुंतागुंत नसेल असे गृहीत धरले तर तुमच्यासाठी प्रवास करण्याचा सर्वोत्तम काळ म्हणजे दुसऱ्या तिमाहीत. जर तुम्ही गरोदर असाल आणि तुम्हाला प्रवास करायचा असेल तर तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या, खासकरून जर तुमची गर्भधारणा जास्त धोका असेल.
- प्रवासापूर्वी डॉक्टरांचा सल्ला : गरोदर असताना कोणताही प्रवास सुरू करण्यापूर्वी, तुमच्या डॉक्टरांशी संपर्क साधा. ते तुमच्या सामान्य आरोग्याचे मूल्यांकन करू शकतात आणि तुम्ही सुरक्षितपणे प्रवास करावा की नाही याबद्दल सल्ला देऊ शकतात. तुमचे डॉक्टर तुमच्या विशिष्ट गरजांवर आधारित गोष्टी किंवा मर्यादा सुचवू शकतात आणि त्याप्रमाणे तुम्हाला काळजी घेण्यासाठी सल्ले देऊ शकतात.
- योग्य स्थान निवडा : वैद्यकीय सेवांसाठी सोयीस्कर प्रवेश असलेली आणि गर्भवती महिलांसाठी योग्य असलेली ठिकाणे निवडा. स्थानिक आजार असलेल्या किंवा गर्भधारणेदरम्यान सल्ला दिला जात नसलेल्या लसीकरणाची मागणी यांसारख्या आरोग्यासाठी महत्त्वपूर्ण धोके असलेली ठिकाणे टाळा. जिथे जाणार असाल तिथे तुम्ही सर्व व्यवस्था आहेत की नाही याची खात्री करून घ्या.
- वेळ महत्वाची : तुमच्या सुट्टीच्या वेळापत्रकाची काळजीपूर्वक योजना करा. सकाळची मळमळ कमी होत असल्याने आणि गुंतागुंत होण्याची शक्यता कमी असल्याने, अनेक स्त्रियांना असे आढळते की दुसरा त्रैमासिक अर्थात Second Trimester (आठवडे 14-27) प्रवासासाठी सर्वात आरामदायक कालावधी आहे.
- योग्य गाडी निवडण्याची गरज : तुम्ही कार, ट्रेन, बोट किंवा अन्य वाहतूक वाहनांचा वापर करत असल्यावर तुमच्या आरामदायी वाहतुकीची योजना करणे गरजेचे आहे. हवेशीर, सैल-फिटिंग कपडे घाला आणि अधिक लेगरूम असलेली सीट निवडा. लांब फ्लाइट किंवा राइडवर, वारंवार ब्रेक घेतल्याने थकवा कमी होण्यास मदत होते.
- औषधे विसरू नका : विटामिन्स, आवश्यक औषधे, आरामदायक शूज आणि ऊर्जा टिकवून ठेवणारे स्नॅक्स हे सर्व एका लहान पिशवीत पॅक केले पाहिजेत. तुमच्या गर्भधारणेच्या वैद्यकीय नोंदी आणि आपत्कालीन संपर्कांची यादी आणण्याचे लक्षात ठेवा. कधीही कोणतीही आपात्कालीन गोष्ट उद्भवल्यास औषधे जवळ असावीत.
- हायड्रेटेड राहा आणि पौष्टिक जेवण घ्या : प्रवास करताना हायड्रेटेड राहण्यासाठी भरपूर पाणी प्या आणि निरोगी, पचायला सोपे जेवण आणि स्नॅक्स निवडा. छातीत जळजळ किंवा अपचन होऊ शकते अशा गोष्टी टाळा आणि कॅफिनचे सेवन मर्यादित करा. सहसा कॅफिन पिणे टाळाच.

### शारीरिक हालचाली

प्रवास करताना, विशेषतः लांब उड्डाणांवर किंवा वाहनांच्या राइडवर, आपले पाय ताणण्यासाठी थोडी विश्रांती घ्या आणि थोडी ताजी हवा घ्या. रक्ताच्या गुठळ्या टाळण्यासाठी आणि घोट्याचा आणि पायाची सूज न येण्यासाठी पायांची हालचाल होणे महत्त्वाचे आहे. त्यानुसारच प्रवास करा. तुमच्या संपूर्ण प्रवासात, तुम्हाला कसे वाटते याकडे बारकाईने लक्ष द्या. तुम्हाला कोणतीही अनपेक्षित वेदना, अस्वस्थता किंवा इतर चिंताजनक लक्षणे जाणवल्यास तत्काळ वैद्यकीय मदत घ्या. कर्मचारी किंवा इतर प्रवाशांकडून मदत मागायला घाबरू नका.

### या गोष्टी ठेवा लक्षात

अनपेक्षित वैद्यकीय खर्चाचा समावेश असलेला प्रवास विमा घेण्याचा विचार करा. हा एक प्रतिबंधात्मक उपाय आहे जो आपण घरापासून दूर असताना आपत्कालीन परिस्थितीत आपल्याला योग्य काळजी मिळेल याची हमी देतो. तुमच्या प्रवासापूर्वी तुम्ही जिथे जाणार आहात तेथे उपलब्ध असलेल्या वैद्यकीय सेवांची तपासणी करा. तुम्हाला वैद्यकीय मदतीची आवश्यकता असल्यास जवळच्या रुग्णालये आणि दवाखान्यांचे पत्ते आणि फोन नंबर सेव्ह करा. काळजीपूर्वक नियोजन आणि आपल्या आरोग्य आणि आरामाकडे लक्ष देऊन, गरोदर असताना प्रवास करणे हा एक मजेदार आणि संस्मरणीय अनुभव असू शकतो. सुरक्षित आणि आनंददायी प्रवास सुनिश्चित करण्यासाठी, तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या, योग्य ठिकाणे निवडा आणि खबरदारी घ्या. तुमच्या स्वतःच्या आणि तुमच्या बाळाच्या आरोग्याला प्राधान्य देताना सुंदर आठवणी बनवू शकता. सुरक्षित प्रवास करा!

# घरातून एकट्या बाहेर पडताय?



### सेफ्टी टूल्सची मदत घ्या

बाहेर पडताना तुमच्यासोबत कायम काही सेफ्टी टूल्स बाळगा. पेपर स्प्रे, नेल फायरल, सेफ्टी पिन, बेल्ट यांचा तुम्ही गरज पडल्यास वापर करू शकता. त्याचप्रमाणे तुमचा दुप्पटा किंवा कमरेचा बेल्टही तुम्ही वापरू शकता.

**अलिकडे प्रत्येक क्षेत्रात महिला आघाडीवर असल्या तरी महिलांसाठी असलेला धोका आजही कायम आहेत. आजही अनेक ठिकाणी महिला असुरक्षित आहेत. कॉलेजमधील तरुणी असो किंवा नोकरी करणाऱ्या महिला आणि गृहिणी अनेकांना घरातून बाहेर पडताना चिंता सतावते. शिक्षण आणि नोकरीच्या निमित्ताने अनेकजणी कुटुंब आणि घरापासून दूर राहत असतात. अशावेळी असुरक्षिततेची भावना कायमच सतावत असते. अनेक ठिकाणी खास करून संध्याकाळनंतर महिलांना घराबाहेर पडणंही मुश्किल आहे. अशात महिलांनी काही गोष्टी ध्यानात घेणं गरजेचं आहे...**

- बेस्ट फ्रेंड फोनची अशी घ्या मदत : कायम तुमच्यासोबत असणारा फोन तुम्ही एकट्या असताना योग्य प्रकारे वापरणं गरजेचं आहे. रात्रीच्यावेळी तुम्ही एकट्या प्रवास करत असाल तर सर्वप्रथम तुमच्या मोबाईलमधील जीपीएस लोकेशन ऑन करा. शक्य असल्यास घरं गाठेपर्यंत तुमचं लाईव्ह लोकेशन घरातील एखाद्या सदस्याला किंवा जवळील मित्र-मैत्रिणीला शेअर करा. कॅब किंवा ऑटोरिक्षाचा नंबरही शेअर करा. याशिवाय तुम्ही घरी पोहचेपर्यंत घरातील एखाद्या व्यक्तीसोबत किंवा मैत्रिणीसोबत फोनवर बोलत रहा. यामुळे तुम्हालाही सुरक्षित वाटेल.
- महत्त्वाचे नंबर सेव्ह करणे : यासोबतच तुमच्या मोबाईलमध्ये कुटुंबातील किंवा मित्र परिवारातील महत्वाचे नंबर सेव्ह असणं गरजेचं आहे. ज्या व्यक्ती तुमचा फोन कधीही उचलतील याचा तुम्हाला विश्वास असेल असे महत्वाचे नंबर सुरुवातीलाच दिसतील असे सेव्ह करावे. जेणे करून तुम्हाला डायल करण्यासाठी ते लगेचच सापडतील. याशिवाय पोलिस हेल्पलाईन नंबर १००, ११२ आणि महिला हेल्पलाईन नंबर १०९१ हे कायम स्पेशल डायलमध्ये सेव्ह असावे. यासोबतच महत्वाची गोष्ट म्हणजे मोबाईल कायम चार्ज असले याची दखल घ्यावी. अगदी कमी बॅटरी असताना प्रवासासाठी बाहेर निघण्याची जोखीम टाळावी.
- रस्त्यावरून चालताना ही काळजी घ्या : रस्त्याने चालत असताना कायम ट्रॅफिकच्या विरुद्ध दिशेने चाला. यामुळे समोरून येणाऱ्या गाड्या तुम्हाला दिसतील, जेणेकरून पाठीमागून हल्ला होण्याची शक्यता कमी होते. चालत असताना जवळील बॅग किंवा हॅण्डबॅगही रस्त्याच्या बाजूला न घेता भिंतीकडील बाजूला धरावी. शिवाय बॅगची पकड घट्ट असेल याची काळजी घ्यावी. कुणी तुमचा पाठलग करतेय असं लक्षात येतात लगेचच एखाद्या जवळचं घरं पाहून डोर बेल वाजवावी.
- योग्य मार्ग निवडा : रस्त्याने एकट्या प्रवास करत असताना लवकर पोहचण्यासाठी तुम्हाला माहीत नसलेला शॉर्टकट टाळावा. सुनसान रस्त्याएवजी गर्दी असलेल्या रस्त्याने जाणं योग्य. कॅब किंवा ऑटोरिक्षा ड्रायव्हर लवकर पोहचवण्यासाठी नवा मार्ग घेण्यासंबंधी विचारत असल्यास ते टाळावं. नेहमीच्याच रस्त्याने जावं. तसंच अंधार असलेले रस्ते टाळावे.
- ड्राइव्ह करताना घ्या ही काळजी : जर तुम्ही एकट्या गाडी चालवणार असाल तर गाडीच्या खिडक्या कायम बंद ठेवाव्यात. फोन कॉल किंवा म्युझिकमध्ये जास्त रमून जाण्यापेक्षा सतर्क रहा. गाडी एखाद्या बेसमेंटमध्ये पार्क करताना विशेष खबरदारी घ्यावी. गाडीतही कायम काही सेफ्टी टूल्स ठेवावे.
- हल्ला रोखण्यासाठी कायम तयार रहा : एकट्या प्रवास करणाऱ्या महिलांनी दक्ष राहणं जितकं गरजेचं आहे, तितकंच एखादा हल्ला झाल्यास स्वतःच रक्षण करण्यासाठीही तयार रहाणं गरजेचं आहे. हल्ला झाल्यास मदतीसाठी जोरात आरडओरड करा. कुणी पाठलाग करत असल्यास लवकरात लवकर किंवा पळ काढून एखादं गर्दीचं ठिकाण गाठा. यावेळी न थांबता चपळाईने पोलिस किंवा जवळच्या व्यक्तीला फोन करा. याशिवाय ज्या महिला नोकरीवरून उशीरा घरी परततात किंवा ज्यांना उशीरा एकट्याने प्रवास करावा लागतो. त्यांनी सोने, चांदी किंवा डायमंटचे महागडे दागिने घालणं टाळावं. या शिवाय इतही महागड्या वस्तू वापरताना काळजी घ्यावी. जसं की फोन, घड्याळ. कारण अनेकदा चोरीच्या उद्देशाने गुन्हेगार अनेक महिलांवर पाळत ठेवून असतात. तसंच पाळत ठेवून राहणाऱ्यांपासून वाचण्यासाठी कायम तुम्ही खूप स्ट्राँग आहात हे दाखवा. कारण गुन्हेगार हे कायम कमजोर आणि घाबरट महिलांना टार्गेट करतात.

### पार्टीत ही काळजी घ्या...

जर तुम्ही एखाद्या पार्टीसाठी रात्री उशिरापर्यंत थांबणार असाल तर काही गोष्टींची खबरदारी घेणं गरजेचं आहे. जसं की पार्टीत तुमच्या जवळच्या व्यक्तींसोबतच कायम रहा. इतर व्यक्तींच्या हालचालींकडे लक्ष ठेवा. पार्टीतून शक्यतो घरी एकटे परतू नका. अशावेळी मित्र-मैत्रिणींसोबतच निघून कुणी घरी सोडेल हे सुनिश्चित करा. तसंच पार्टीत दारू किंवा इतर नशेच्या पदार्थांचं सेवन करू नका. जर तुम्ही एकटे एखाद्या पार्टीत जात असाल तर शक्य असेल त्या जवळच्या व्यक्तीला त्याबद्दलची कल्पना देऊन ठेवा. जसं की पार्टीचं ठिकाणी, ती कुणाची पार्टी आहे आणि वेळेसंबंधी कल्पना द्या.



# आला 'सनस्क्रीन'चा मोसम!

**उन्हाळा म्हणजे रोजच्या मेकअप उत्पादनांमध्ये सनस्क्रीन आवर्जून समाविष्ट करण्याचा काळ. सनस्क्रीन वेगवेगळ्या प्रकारांत मिळतं. क्रीम, लोशन, कॉम्पॅक्टसारखी पावडर हे प्रकार तर आपल्या परिचयाचे आहेतच, पण क्वचित तेलासारखं पातळ द्रव्य किंवा अगदी स्प्रेच्या स्वरूपातही वेगवेगळ्या ब्रँडस् चं सनस्क्रीन बाजारात उपलब्ध आहे. उन्हाळ्यासाठी सनस्क्रीन खरेदी करण्यापूर्वी सनस्क्रीन नेमकं का लावतात आणि त्याचा चांगला उपयोग व्हावा यासाठी काय करावं, यासंबंधीच्या काही टिप्स पाहू या...**




### सनस्क्रीन का लावतात ?

ढोबळमानानं सांगायचं तर सूर्यकिरणांमध्ये 'यूव्हीए' आणि 'यूव्हीबी' अशी दोन प्रकारची अतीनील (अल्ट्राव्हायोलेट) किरणं असतात. यातल्या 'यूव्हीबी' किरणांची तरंगलांबी 'यूव्हीए'पेक्षा कमी असते आणि त्यामुळे 'यूव्हीबी' किरणांमुळे होणारं त्वचेच्या वरच्या थराला- म्हणजे 'एपिडर्मिस'ला नुकसान पोहोचतं. 'यूव्हीए' किरणांची तरंगलांबी जास्त असल्यामुळे ती त्वचेत खोलवर जाऊन नुकसान करू शकतात. खूप वेळ कडक उन्हात वावरल्यामुळे त्वचेच्या वरच्या थरात त्वचेचा पोत बिघडणं, 'सनबर्न' होणं, या तक्रारी उद्‌भवतातच, पण आतल्या थरांमध्ये जाऊन नुकसान करणाऱ्या अतीनील किरणांमुळे त्वचेवर सुरकुत्या पडणं, त्वचा अकाली म्हातारी होणं, त्वचेवर काळे डाग पडणं अशा समस्याही उद्‌भवू शकतात. अतीनील किरणं त्वचेतील जनुकांमध्ये बदल घडवण्याच्या प्रक्रियेस चालना देऊन त्वचेच्या कर्करोगासाठीही कारणीभूत ठरत असल्याचं मानलं जातं. या गोष्टींना आळा बसावा यासाठी अधिक काळ उन्हात फिरायचं असेल तर सनस्क्रीन लावतात. परंतु खरंतर केवळ उन्हाळ्यात किंवा कडक ऊन असतानाच नव्हे, तर नेहमीच बाहेर जाताना चांगल्या दर्जाचं सनस्क्रीन वापरल्यास चांगलं, असं सांगितलं जातं.

### सनस्क्रीनचा 'एसपीएफ' जितका अधिक, तेवढं सन प्रोटेक्शन जास्त

या दिवसांत सतत घाम येत असल्यामुळे तुम्ही खूप वेळ उन्हात फिरणार असाल, तर 'वॉटर रेझिस्टंट सनस्क्रीन' चांगलं. वॉटर रेझिस्टंट सनस्क्रीन साधारणपणे दोन तास त्वचेवर टिकतं. त्यानंतर लागेल तसं ते पुन्हा लावावं. सनस्क्रीनमध्येसुद्धा त्वचेच्या प्रकारानुसार वेगवेगळे प्रकार मिळतात. म्हणजे तुमची त्वचा जर तेलकट असेल, तर 'लाईटवेट' आणि 'ऑईल फ्री' लिहिलेलं सनस्क्रीन वापरा. त्वचा कोरडी असेल, तर ज्या सनस्क्रीनमध्ये ग्लिसरिन वा 'हायाल्युरॉनिक ॲसिड' आहे, असं सनस्क्रीन चांगलं ठरेल. खूप संवेदनशील असलेल्या त्वचेसाठी 'झिंक



ऑक्साईड' वा 'टायटॅनियम डायॉक्साईड' असलेलं गंधरहित सनस्क्रीन वापरायला सांगितलं जातं. बऱ्याचदा 'स्किन टाईप' सनस्क्रीनच्या बाटलीवर छापलेला असतोच, तो तपासून घेतल्यास योग्य सनस्क्रीन निवडणं सोपं होईल.

### खरेदी व वापरापूर्वी या काही टिप्स लक्षात ठेवा...

या दिवसांत रोज बाहेर पडताना आठवणीनं सनस्क्रीन लावाच, पण सनस्क्रीनची एखादी लहान बाटली पर्समध्ये कायम बरोबर बाळगा. सनस्क्रीन एका वेळी भारंभार लावावं लागत नाही. एका बोटाच्या अग्रावर अर्थात 'फिंगरटिप'वर सनस्क्रीन घेऊन तेवढंच नीट पसरून लावलेलं पुरतं. चेहरा,



गळा, मान वा हातांवर खूप घाम येत असतो. घाम वारंवार पुसताना किंवा चेहरा धुतल्यावर सनस्क्रीन निघून जातं. त्यामुळे लागेल तसं सनस्क्रीन पुन्हा लावायला हवं. बहुतेक लोक चेहऱ्यावर मॉईश्चरायझर, फाऊंडेशन वगैरे विविध प्रॉडक्टस् वापरत असतात. अशा वेळी सनस्क्रीनचा थर सर्वांत शेवटचा असू द्या. चेहऱ्यावर वापरायच्या विविध उत्पादनांमध्ये 'एसपीएफ' अर्थात 'सन प्रोटेक्शन' असतं. या प्रॉडक्टस्च्या बाटली वा ट्यूबवर तुम्हाला 'एसपीएफ १५', 'एसपीएफ ३०' असा काही तरी आकडा लिहिलेला सापडेल. मग ही उत्पादनं लावून भागेल का? आणि वेगळं सनस्क्रीन लावण्याची गरज आहे का? असा अनेकांचा प्रश्न असतो. मात्र स्किन केअर तज्ज्ञांच्या मते अशा इतर उत्पादनांपेक्षा कडक उन्हात 'डेडिकेटेड ब्रॉड स्पेक्ट्रम सनस्क्रीन'चा अधिक चांगला उपयोग होतो.

## शॉर्ट न्यूज

### अल्पवयीन मुलीवर आठ वर्षांपासून अत्याचार

**राहुरी :** तालूक्यातील वांबोरी परिसरात एका पिडीत मुलीच्या घरी दिवाळीच्या व उन्हाळ्याच्या सुट्टीत दोन आरोपी तीच्या घरी येत असत. त्या दोघांनी सन २०१६ ते एप्रिल २०२४ या दरम्यान पिडीत मुलीवर तीच्या घरात लैंगिक अत्याचार करत मोबाईलमध्ये व्हिडिओ शूटिंग करून तिला वेळोवेळी ब्लॅकमेल केले. तसेच गावठी पिस्टलचा धाक दाखवून तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केले. राहुरी पोलिस ठाण्यात आरोपी ऋषिकेश पांडुरंग धोंडे व सतीश विठ्ठल टकले, दोघे रा. आष्टी, जि. बिड, या दोघांवर मारहाण, धमकी, अपहरण, बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

### कांद्याला २१०० रुपयांचा भाव

**संगमनेर :** येथील बाजार समितीत सोमवार (ता. ६) कांद्याचे लिलाव झाले. यामध्ये एक नंबर कांद्याला सर्वाधिक २१०० रुपयांचा भाव मिळाला. कांद्याच्या ३०८१९ गोण्यांची आवक झाली. कांद्याचे प्रतवारीनुसार प्रतिक्विंटलला भाव: सुपर गोल्टा कांद्याला: २२०० ते २४०१, एक नंबर कांद्याला:१७०१ ते २१००, दोन नंबर कांद्याला: ११०० ते १६००, तीन नंबर कांद्याला: ६०० ते ९००, चार नंबर कांद्याला: २०० ते ४०० भाव मिळाला.

### खेळाडूंना सहभागी होण्याचे आवाहन

**अहमदनगर :** जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या वतीने राज्यस्तरीय सब ज्युनिअर मुलांच्या फुटबॉल स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणीला सोमवार (दि.६ मे) भुईकोट किल्ला मैदान येथे प्रारंभ झाले आहे. या निवड चाचणीद्वारे जिल्ह्याचा संघ निवडला जाणार असून, या निवड चाचणीत सहभागी होण्यासाठी फुटबॉल संघ व खेळाडूंना सीआरएस नोंदणी करुन सहभागी होण्याचे आवाहन असोसिएशनच्या वतीने करण्यात आले आहे. असोसिएशनचे सचिव रोनप ॲलेक्स फर्नांडिस यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंची निवड होणार आहे.

### आ.कानडे यांची भाजपवर टीका

**श्रीरामपूर :** भाजपाने सत्तेचा उपयोग शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी न करता पैसे कमवण्यासाठी केला. त्यामुळे लोकसभेची ही निवडणूक देशाच्या भवितव्याची असून देशाची लोकशाही व संविधान वाचविण्यासाठी असल्याचे प्रतिपादन आमदार लहू कानडे यांनी केले. शिर्डी लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या प्रचारार्थ श्रीरामपूर तालुक्यातील घुमनदेव, कमालपूर, खानापूर, माळवाडगाव, मुठेवाडगाव, हरेगाव, उंदिरगाव व ब्राह्मणगाव वेताळ या गावात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत आ. कानडे बोलत होते.

### जलजीवन योजनेचे काम रखडले

**नेवासा :** तालुक्यातील खेडले परमानंद येथील जल जीवन योजनेचे तीन तेरा वाजले आहेत. जल जीवन योजनेची पाण्याची टाकी ग्रामस्थांच्या मागणीनुसार २०० मीटर बदलण्यात आलेली आहे. सदरचे काम जाणीवपूर्वक रखडले जात असल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. यासंबंधीचे निवेदन ग्रामस्थांच्यावतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी येरकर, जिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्याकडे पाठवण्यात आले आहे. त्याचप्रमाणे या योजनेचे पाईपलाईनचे काम फक्त विस टक्केच पूर्ण झाले असून या योजनेला कुणाची नजर लागली की काय? असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.

# बारामतीच्या बाहेर जावून त्यांनी काय केले?

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचा सवाल

नगर : प्रतिनिधी



**शरद पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते, केंद्रातही त्यांना मंत्रीपद मिळाले, बारामतीच्या बाहेर जावून त्यांनी काय केले? असा सवाल उपस्थित करीत नगर जिल्ह्यात आलेले उद्योग ही पवारांची मेहेरबानी नाही. आम्ही काय केले यापेक्षा दाऊदच्या हस्तकांना तुम्ही विमानातून घेवून आलात हे देशाची जनता अजुन विसरलेली नाही अशी खरमरीत टिका महसूल, पशुसंवर्धन व दूग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली.**

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी शरद पवार यांच्यावर निशाणा साधला. शरद पवार यांनी नरेंद्र मोदी यांच्यावर बोलावे हेच मुळात दुर्दैव आहे. मोदीजींच्या सहकार्यामुळेच शरद पवारांचे राजकीय अस्तित्व टिकुन आहे. विखे पाटलांनी काय केले हे शरद पवारांना सांगण्याची गरज नाही. या जिल्ह्यातून आठ वेळा बाळासाहेब विखे पाटील यांना संसदेत प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. मलाही सात वेळा जनतेने निवडून दिले, ही आमच्या कामाची पावती आहे असे स्पष्ट करुन, शरद पवार यांचे जिल्ह्यासाठी काय योगदान आहे हे त्यांनी एकदा सांगावे असे थेट आव्हान ना.विखे पाटील यांनी दिले.

शरद पवार यांचे कर्तृत्व काय हे राज्यातील आणि देशातील जनतेने पाहीले आहे. बारामतीच्या बाहेर ते काहीही करु शकलेले नाहीत. केवळ संस्था बळकावण्याचे काम त्यांनी केले. रयत शिक्षण संस्था ताब्यात घेवून त्याचा राजकीय अड्डा कसा केल्याची टिका मंत्री विखे पाटील यांनी केली.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यावरही मंत्री विखे पाटील यांनी निशाणा साधला. थोरात वैफल्यग्रस्त झाले असून, त्यांच्या बोलण्याला आता कुठलाही आधार राहीलेला नाही. डॉ.सुजय विखे पाटील यांनी मागील पाच वर्षात केलेल्या कामांची चित्रफीत मी थोरात यांना पाठविणार असून, थोरातही अनेक वर्षे राज्याच्या मंत्रीमंडळात होते. नगरसाठी त्यांचे योगदान काय? मंत्री पदाच्या माध्यमातून तुम्ही जिल्ह्याला कसा फायदा करुन दिला, हे एकदा तरी सांगा. नाहीतर मी तरी महसूल मंत्रीपदाच्या माध्यमातून जिल्ह्यासाठी कोणते निर्णय केले हे सांगायला तयार आहे. पुर्वीप्रमाणे बदल्यांचे रेटकार्ड आमच्याकडे नाही. भारतीय जनता पक्षामध्ये येण्याची तुमची तयारी झाली होती. तुमच्यासाठी कोणता आमदार मध्यस्थी करीत होता हे मला माहीत आहे. तुमच्या भ्रष्ट कारभारामुळे दिल्लीतून कसा नकार मिळाला. याचे शल्य आता थोरात यांना असल्याचा टोला मंत्री विखे पाटील यांनी लगावला.

प्रकाश आंबेडकरांनी केलेल्या वक्तव्यावर आपली प्रतिक्रीया व्यक्त करताना अशी उथळ विधाने त्यांनी टाळली पाहीजेत एवढेच भाष्य मंत्री विखे पाटील यांनी केले. अमोल कोल्हे यांनी प्रचार सभेतून केलेल्या टिकेचाही त्यांनी समाचार घेतला. कोल्हेंना अजुन खुप माहीती करुन घ्यायची आहे. यासाठी त्यांना नाटकातून बाहेर याचे लागेल असेही ते म्हणाले.

# वेताळबाबाच्या यात्रोत्सवास सुरूवात

## लोकनाटय, कुस्त्यांच्या आखाडयाचेही आयोजन

गाडीलगांव : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील गाडीलगांव येथील ग्रामदैवत वेताळ बाबा यांच्या यात्रोत्सवास मंगळवारी मोठया उत्साहात सुरूवात झाली.यात्रोत्सवानिमित्त लोकनाटय तसेच कुस्त्यांच्या आखाडयाचे आयोजन करण्यात आले आहे.**

यात्रोत्सवानिमित्त वेताळबाबांच्या मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली असून परिसर उजाळून निघाला आहे. सकाळी महापुजनेने यात्रोत्सवास प्रारंभ झाला. दिवसभर ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भाविक तसेच मुंबई, पुण्यामध्ये वास्तव्यास असलेल्या गाडीलगांवकरांनी दर्शनासाठी दिवसभर गर्दी केली होती.



रात्री ८ ते ९.३० दरम्यान छबिना पार पडला. रात्री १० ते १२ दरम्यान महाराष्ट्रातील नामवंत असलेल्या दिपाली सुरेखा पुणेकर नारायणगांवकर यांच्या लोकनाटय तमाशाचे आयोजन करण्यात आले होते. तमाशा शोकिनांनी लोकनाटयाचा मनमुराद आनंद लुटला.

बुधवारी सकाळी ९ ते दुपारी १२ दरम्यान हजेरीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सायंकाळी ५ ते ७ दरम्यान निकाली कुस्त्यांच्या मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे. या मैदानामध्ये तालुका तसेच तालुक्याबाहेरील नामवंत पैलवान हजेरी लावणार आहेत. कुस्त्यांच्या मैदानासाठी कुस्तीशोकिनांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा यात्रोत्सव कमिटीचे उपाध्यक्ष सुरेश गाडीलकर यांनी केले आहे.

# एक तुतारी द्या मज आणुनि...

## ■ शिरुरमध्ये तुतारीवाल्यांचा भाव वधारला
## ■ निवडणुकीतील चिन्हामुळे मागणीत वाढ

शिरुर : सतीश डोंगरे



**एक तुतारी द्या मज आणुनि,
फुंकिन मी जी स्वप्राणाने...**

**कवी केशवसुत यांनी तुतारी या कवितेतून तुतारीचे महत्व विशद केले आहे. ऐतिहासिक काळात महत्व प्राप्त झालेली तुतारी सध्या दुर्मिळ होत चालली आहे. केवळ लग्न कार्यात क्वचित दिसणारी ही तुतारी आता शिरुर लोकसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस - शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांचे निवडणूक चिन्ह आहे, त्यामुळे ती चांगलीच भाव खात आहे. निवडणुकीच्या रणधुमाळीत तालुक्यात सध्या तुतारी फुंकणाऱ्यांना सुगीचे दिवस आले आहेत.**

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला तुतारी चिन्ह मिळाल्याने हे वाद्य भलतेच चर्चेत आले आहे. तुतारी चिन्ह ठळकपणे लक्षात राहावे, तुतारीच्या गगनभेदी ललकारीने मतदारांचे लक्ष वेधले जावे म्हणून पक्षाकडून त्याचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे, पण तुतारी वाजवणारे कमी आणि मागणी जास्त असे सध्याचे चित्र आहे. त्यामुळे पारंपरिक कलावंतांना सुगीचे दिवस आल्याचे चित्र शिरूर लोकसभा मतदारसंघात दिसून येत आहे.

राष्ट्रवादीचे पदाधिकारी तुतारीवाल्यांना शोधून काढत आहेत. त्यांना आगाऊ रक्कम देऊन बुकिंग केले जाते आहे. राष्ट्रवादीने तुतारीवाल्यांना बुक केल्याने लग्नात तुतारी मिळणे अवघड झाले आहे. सध्या निवडणूक व लग्नसराईचा हंगाम चालू असल्याने तुतारीवाल्यांना चांगलाच भाव आला आहे. एरव्ही लग्नात ८०० ते १००० रुपयांची मिळणारी मजुरी १५०० ते २००० रुपयांवर गेली आहे. त्यामुळे तुतारीवाले वाहत्या गंगेत हात धुऊन घेत आहेत.

ऐतिहासिक वारसा असलेल्या तुतारीला आजही अनेक ठिकाणी गावगाड्याच्या जत्रांमधून देवी-देवतांच्या छबिन्यासमोर मान आहे. आजही काही मानाचे छबिने तुतारी वाजवल्याशिवाय सुरू होत नाहीत. यावरून तुतारीचे महत्त्व लक्षात येते.

### भविष्यात तुतारी फुंकणाऱ्यांना चांगले दिवस येतील !

**सध्या निवडणुका आणि लग्नसराई यामुळे तुतारी साठी मागणी वाढली आहे. दुसरीकडे शिरूर तालुक्यात तुतारी वाजविणाऱ्यांची संख्या बोटावर मोजण्याइतपत आहे. तुतारी फुंकणे सोपी गोष्ट नाही. बेंबीच्या देठापासून हवा भरून तुतारी हे वाद्य फुंकावे लागते. त्यामुळे नवी पिढी यासाठी पुढे येत नाही. सध्या मी माझ्या मुलाला तुतारी फुंकण्याचे प्रशिक्षण देत आहे. भविष्यात तुतारी फुंकणाऱ्यांना निश्चित चांगले दिवस येतील अशी आशा आहे.**

**भाऊ जाधव**
तुतारी वादक, निमगाव भोगी

लग्नसराई संपली की तुतारीवाल्यांना उत्पन्नाचे साधन राहत नाही. त्यांना इतर व्यवसाय शोधावे लागतात.मराठमोळ्या सर्वच कार्यक्रमांमध्ये सध्या तुतारी वादनाचा आवर्जून हट्ट केला जातो. तुतारी वाजवण्याची कला लोप पावत चालली होती. तुतारीचा एक सूर असतो तो सर्वांनाच जमतोच असे नाही. तुतारी वाजविणे हा गरीब लोकांचा व्यवसाय आहे; परंतु आता मागणी खूप वाढल्याने तुतारी वादक तयार करण्याचे आव्हान समोर आहे.

(पान १ वरून)

### ग्रामपंचायतप्रमाणे निवडणूक लढवा!

नाहीत. पाच वर्षापूर्वी ज्यांना आपण संसदेत पाठविले त्यांनी विकासाच्या केवळ गप्पा मारल्या. विकास कामे काय केले हे सांगण्यासाठी काही नसल्याने त्यांनी डाळ आणि साखर वाटपाचा फंडा काढला, मात्र त्यांना रोषाला सामोरे जावे लागले. शेतकरी वर्गाने त्यांना कांदा, दुधाच्या पडलेल्या भावाबद्दल जाब विचारला. साकळाई योजना पुर्ण केली नाही तर उमेदवारी करणार नाही असे सांगणारे सुजय विखे हे अर्ज दाखल करून आता कोणत्या तोंडाने मते मागत आहेत ? असा सवाल लंके यांनी केला. यावेळी सरपंच शरद पवार यांनी व्हिडीओद्वारे ग्रामस्थांशी संवाद साधला.

विरोधकांकडून आवाज दाबण्याचा प्रयत्न

विरोधकांनी जुन्या कारणावरून माझी गावबंदी केली आहे. आ. नीलेश लंके यांची उमेदवारी जाहिर झाल्यापासून गावागावांमधील नागरीकांकडून त्यांच्याशी संवाद साधण्याची मागणी करीत होते. त्यामुळे चिचोंडी पाटील येथे सभा घेण्यात आली. कोरोना संकटात गावातील कुसूम पटेकर यांचा स्कोअर अधिक असल्याने त्यांना घरी घेऊन जाण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला होता. आपण नीलेश लंके यांच्याशी संपर्क केल्यानंतर त्यांनी जिल्हा रूग्णालयात फोन करून बेड उपलब्ध करून दिले. तिथे उपचार घेऊन ही महिला घरी पोहचली. खोटया गुन्हयात अडकवून सत्तर ते ऐंशी पोलीसांना पाठवून माझा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला. मतदार मतपेटीतून त्यास चोख उत्तर देतील.

शरद पवार, सरपंच,चिचोंडी पाटील

### भाळवणीत बर्निंग कारचा थरार !

यांनी कारची काच फोडून बाहेर पडण्यात यशस्वी झाले. रणरणच्या उन्हामध्ये आग विझविण्याची कोणतीही यंत्रणा जवळपास उपलब्ध नसल्याने ही कार संपूर्णपणे जळून खाक झाली.

कारबाहेर पडल्यानंतर तीन तरूण व तरूणी घटनास्थळापासून पसार झाले. कारने पेट घेतल्याने परिसरात घबराटीचे वातावरण तयार झाले होते. घटनास्थळी नागरीकांची मोठी गर्दी झाली होती.









# प्रत्येक गावात कोट्यावधींचा निधी दिला

## ■ आ. नीलेश लंके यांचे प्रतिपादन ■ कान्हूरपठार येथे आढावा बैठक

कान्हूरपठार : प्रतिनिधी

**सन २०१९ मध्ये पारनेर-नगर मतदारसंघातील जनतेने तब्बल साठ हजार मतांच्या विक्रमी मताधिक्क्याने विधानसभेत पाठविल्यानंतर मतदारसंघातील विकास कामांसाठी दिवसरात्र झटलो. कोणताही राजकिय अभिनिवेश न पाहता प्रत्येक गावामध्ये कोटयावधी रूपयांचा निधी देत मतदारसंघ वेगळया उंचीवर नेऊन ठेवला. याच कामाची पावती म्हणून मला मतदारसंघात किमान १ लाखांचे मताधिक्य मिळेल असा विश्वास आमदार नीलेश लंके यांनी व्यक्त केला.**

लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर कान्हूरपठार गणातील वेसदरे, पिंपळगांव तुर्क, वडगांव दर्या, विरोली, पिंपरी पठार, करंदी, किन्ही, जाधववाडी या गावांतील नागरीकांशी कान्हूरपठार येथे पार पडलेल्या बैठकीत आ. लंके यांनी संवाद साधला. यावेळी लंके यांनी प्रत्येक गावातील राजकीय स्थितीचा आढावा घेतला.
यावेळी बोलताना लंके म्हणाले, पाच वर्षात तळा गाळातील सर्व घटकांना न्याय देण्याचा आपण प्रामाणिकपणे प्रयत्न केला.कोणताही भेदभाव न करता आपल्याकडे आलेल्या प्रत्येक व्यक्तीचे काम मार्गी लावले. पक्ष, पार्टी असा भेदभाव कधीही केला नाही.

लंके पुढे म्हणाले, नीलेश लंके नेहमीच समाजासाठी जगला, स्वतःसाठी मी कधीच काही मागितले नाही. मतदारसंघाच्या भल्यासाठी दिवसरात्र झटलो. कोटयावधींचा निधी उपलब्ध केला.

या बैठकीस राजेंद्र चौधरी, मारूती रेपाळे, शिवाजी औटी, शालिनी घुले, प्रियंका खिलारी, सुभाष नवले, शिवाजी व्यवहारे, डी.सी.व्यवहारे, महेंद्र गायकवाड, भागाजी नवले, चंद्रभान ठुबे, शिवाजी शेळके, किरण ठुबे, प्रसाद नवले, गणेश तांबे, धनंजय व्यवहारे, सुनिता गायखे, सविता ठुबे, अनिल तिकोणे, उत्तम गायकवाड, सुलोचना शिंदे, भास्कर गव्हाणे, शिताल पागिरे, दत्ता गुंड, चंदू खोडदे, त्रिंबक मुळे, प्रशांत बोरूडे, लहू बुचूडे, अशोक राऊत, बबन ठुबे, अशोक शेळके, प्रशांत राऊत आदी उपस्थित होते.



### मायबाप जनता हीच माझी संपत्ती

आमदार झाल्यानंतर आमदारांचे कारखाने बंगले उभे राहतात. माझी संपत्ती मात्र आमदार झाल्यानंतर घटली, कर्जही वाढले. मला संपत्तीचा कधीही हव्यास नव्हता व यापुढील काळातही नसेल. मायबाप जनता हीच माझी लाख मोलाची संपत्ती असल्याचे लंके म्हणाले.

### प्रत्येक गावात काम

आमदार म्हणून काम करण्याची संधी मतदारांनी दिल्यानंतर या संधीचे सोने करण्यासाठी आपण प्रयत्नांची पराकाष्टा केली. शासनाच्या विविध योजना गावागावांमध्ये राबवून विकास कामांचे जाळे निर्माण केले. प्रत्येक गावामध्ये किमान एक कोटी रूपयांचे काम करून आपण आपल्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरविल्याचे लंके म्हणाले.

### डफडयावाल्यांमध्ये स्पर्धा !

लंके म्हणाले, विरोधकांचे तालुक्यात चार-दोन डफडयावाले आहेत. विरोधकांची डाळ आणि गुळ वाटण्यासाठी डफडयावाल्यांमये जणू स्पर्धाच लागली होती. विरोधकांचे मोबाईलवर स्टेटस ठेवण्यासाठी त्यांना त्यांचे मोबाईल रिचार्ज मारून द्यावे लागते इतकी वाईट वेळ त्यांच्यावर आल्याची टीका लंके यांनी केली.

### माजी सैनिकांकडून निवडणूक निधी

आ. नीलेश लंके हे मोठया शक्तीविरोधात ही निवडणूक लढवित असून त्यांना मदत म्हणून कान्हूरपठारमधील माजी सैनिक गणेश गायखे, संपत ठुबे, हरी व्यवहारे यांनी एक महिन्यांची पेन्शन निवडणूक निधी म्हणून आ. लंके यांच्याकडे सुपूर्द केली.

### आपला गुलाल फिक्स !

धनशक्तीविरोधात जनशक्ती अशी ही लढत आहे. सर्वसामान्य शिक्षकाच्या घरातील उमेदवाराविरोधात प्रचार करण्यासाठी देशाचे पंतप्रधान नगरमध्ये येत आहेत यातच माझा विजय निश्चित आहे. आजवर आपण आपल्या देशाचे पंतप्रधान दुरचित्रवाणीवर पाहिले. या निवडणूकीच्या निमित्ताने पंतप्रधान, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, उपमुख्यमंत्री यांना नगरमध्ये यावे लागते तरीही आपला गुलाल फिक्स असल्याचा आत्मविश्वास लंके यांनी व्यक्त केला.

### विरोधक हतबल

आपण या निवडणूकीमध्ये उतरल्यानंतर मतदारांनीची ही निवडणूक हाती घेतली आहे. पारनेर-नगर मतदारसंघासह लोकसभा मतदारसंघातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात आपल्या उमेदवारीस मोठा प्रतिसाद मिळत असल्याने विरोधक हतबल झाले आहेत. पारनेरमध्ये आपल्याला रोखण्याचा त्यांनी केविलवाणा प्रयत्न केला, मात्र त्यातही त्यांना यश आले नसल्याचे लंके यांनी यावेळी सांगितले.

# खा.विखे पाटलांच्या प्रचारात वराळांची पाचवी पिढी!

## आयुष सचिन वराळ पाटील प्रचारात सक्रिय

निघोज : प्रतिनिधी

**गेली पन्नास वर्षात समाजकारण व राजकारणात सक्रिय राहताना पारनेर तालुक्यातील निघोज या गावातील वराळ पाटील यांची पाचवी पिढी आयुष सचिन वराळ पाटील या विद्यार्थी जीवनात कार्यरत असलेल्या युवकाने लोकसभा निवडणुकीतील भाजपचे उमेदवार खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी पाच पन्नास युवकांच्या माध्यमातून सक्रिय झाल्याने गेली अनेक वर्षांपासून विखे पाटील कुटुंबाचे समर्थन करणाऱ्या वराळ पाटील यांची ही पाचवी पिढी प्रचाराच्या माध्यमातून काय करिष्मा करणार याची उत्सुकता निघोज आणि परिसरातील लोकांना लागली असून आयुष याच्या प्रचाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

आयुष हा पुणे येथील उच्च महाविद्यालयात शिक्षण घेत असून तो सुट्टीसाठी गावी आला आहे. पणजोबा किसनराव वराळ पाटील,आजोबा मच्छिंद्र वराळ पाटील, चुलते संदीप वराळ पाटील यांनी गेली पन्नास वर्षात विखे पाटील कुटुंबाचे समर्थन करीत त्यांना पाठबळ दिले होते. तसेच सध्या आई सरपंच चित्राताई सचिन वराळ पाटील, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील हे विखे पाटील यांच्या प्रचारार्थ काम करीत



आहेत.

आपलाही खासदार विखे पाटील यांच्या विजयात हातभार असावा यासाठी आयुष याने गेली चार दिवसांपासून विखे पाटील यांचा प्रचार सुरू केला असून पाच पन्नास युवकांच्या माध्यमातून मोटरसायकल रॅली तसेच गाव व परिसरात पायी पदयात्रा करीत आयुष याने पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधान का झाले पाहिजे तसेच खासदार डॉ सुजय विखे पाटील यांनी गेली पाच वर्षात विकासाच्या कोणत्या योजना राबवल्या तसेच पुन्हा विखे पाटील यांना दुसऱ्यांदा खासदार म्हणून का निवडून द्यायचे याचे सविस्तर लोकप्रबोधन करीत आयुष याने युवकांच्या सहाय्याने प्रचार यंत्रणा सक्षमपणे सुरु केल्याने त्याचे परिसरात कौतुक होत आहे.

# खडकवाडी येथील आदर्श इन्स्टिटयूटचे विविध स्पर्धा परीक्षेत यश

## विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा

खडकवाडी : प्रतिनिधी

**विद्यालयातील १२ वी च्या विद्यार्थ्यांनी जे. ई. ई. परीक्षेमध्ये तर ५ वी च्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेची शिष्यवृत्ती परीक्षेत व मंथनच्या परीक्षेत यश मिळवत विद्यालयच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहेत.**

खडकवाडी (ता. पारनेर) येथील आदर्श ग्रुप इन्स्टिटयूटचे आदर्श महाविद्यालयाने खूप कमी कालावधी मध्ये ग्रामीण भागातील






विद्यार्थ्यांना उत्कृष्ट शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. १२ वी चे विद्यार्थ्यी यश दिनकर बागुल याने ७६. ८९ टक्के, दिनेश विठ्ठल जाधव याने ७६.४४ जे. ई. ई. परिक्षेत गुण मिळविले आहेत.

केरळ, दिल्ली यासारख्या शिक्षणात अग्रेसर असणाऱ्या राज्यातून शाळेची गुणवत्ता वाढावी म्हणून उच्च शिक्षित शिक्षक खडकवाडी सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे काम करतात.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्षा इंद्रायणी ढोकळे, सचिव डॉ. बाबासाहेब ढोकळे, देवराम ढोकळे, लहानू ढोकळे, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन व कौतुक केले.

# टाकळी ढोकेश्वरला ५ दिवशीय उरुस

## ९ मे पासून प्रारंभ



टाकळी ढोकेश्वर: प्रतिनिधी

**टाकळी ढोकेश्वर येथील सदगुरु हजरत सुफी मोहम्मद इस्माईल शाह मजीदी यांच्या चौथा उर्स शरीफ दि.९ मे ते १३ मे २०२४ रोजी संपन्न होणार आहे.**

या कार्यक्रमात सज्जादा नशिन सुफी संत रफिकउल अवलिया इस्माईली,सुफी संत इब्राहिममियाँ इस्माईली, सुफी संत शफीमियाँ इस्माईली यांनी कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

या कार्यक्रमासाठी पोलीस प्रशासन,महसूल प्रशासन,ग्रामपंचायत टाकळी ढोकेश्वर तसेच पत्रकार बांधवांनी यांचे दरवर्षी प्रमाणे संपूर्ण सहकार्य असणार आहे. तसेच लोकसभा निवडणुकीचे आचारसंहितेचे पालन करूनच संपूर्ण कार्यक्रम पार पडणार आहे. अशी माहीती कार्यकारी विश्वस्त ॲड.समिर पठाण यांनी दिली.

# रांजणखळगे (कुंड ) खंडोबा पाउतके रस्ता झाला मजबूत

## सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्याचे काम पुर्ण

निघोज : प्रतिनिधी

**जवळा - निघोज बाह्यवळण ते खंडोबा पाउतके पर्यंतचा ७२० मीटर रस्ता चकाचक व मजबूत झाला असून गेली आठ दिवसात या रस्त्यावरुन जगप्रसिद्ध रांजणखळगे ( कुंड ) परिसराकडे मोठी वाहतूक झाली असून आठ दिवसात दहा हजार पेक्षा जास्त दुचाकी व चारचाकी वाहने यांनी ये जा केली असून अतिशय मजबूत काँक्रीटीकरण करुन हा रस्ता तयार केल्याबद्दल मळगंगा कंट्रक्शनचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ व सागरशेठ रसाळ यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.**

महाविकास आघाडीचे सरकार असतानाच या रस्त्याचा प्रस्ताव मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टने आमदार नीलेश लंके यांचेकडे दिला होता तीन महिन्यांपूर्वी महायुती सरकार आल्यानंतर आमदार लंके यांच्या हस्ते या रस्त्याचे भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर हे काम प्रत्यक्षात सुरु झाले. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असल्याने गेली अनेक वर्षांपासून मुरुम टाकून हा रस्ता प्रत्येक यात्रेला तयार करण्यात येत होता. संबंधित विभागाकडून आजपर्यंत या रस्त्यासाठी लाखो रुपये खर्च होत होता.

हा रस्ता चारी रोड असल्याने म्हणजे कुकडी डावा कालवा नारायणगाव विभागाच्या



अंतर्गत असल्याने पक्के काम करण्यासाठी अडचणी येत होत्या. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने पाटबंधारे खात्याकडे परवानगी घेऊन हा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवल्यानंतर रितसर सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी परवानगी मिळाली व रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. मळगंगा कंट्रक्शनचे अध्यक्ष अमृताशेठ रसाळ,सागरशेठ रसाळ यांनी दिड ते दोन महिन्यांत काम पुर्ण केले रस्ता अतिशय मजबूत होईल यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न केले.तसेच सर्वाधिक पाणी यासाठी उपलब्ध होण्यासाठी तीन आठवडे तुषार सिंचन माध्यमातून पाणी टाकीत तसेच पुर्ण रस्त्यावर बारदाणे माध्यमातून सर्वाधिक पाणी मिळवीत तीन आठवडे पाण्याचा पुरेपूर वापर केल्याने रस्ता मजबूत झाला आहे. शिवाय कुंड यात्रेच्या दिवशी या रस्त्यावर रात्री दहा ते अकरा या दरम्यान पुन्हा चाळीस हजार लिटर पाण्याचा मारा करीत मळगंगा कंट्रक्शनने या रस्त्याची दखल चांगल्याप्रकारे घेतल्याने भाविक,यात्रेकरु व ग्रामस्थ यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

### मेहनतीशिवाय पर्याय नाही

या बाह्यवळण रस्त्याचा वापर मोठ्या प्रमाणात भाविक व यात्रेकरुंनी केल्यामुळे गावातील विशेष करुन एसटी बसस्थानक परिसर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक या ठिकाणी वाहतूकीला कोणत्याही प्रकारचा अडथळा न येता वाहतूक सुरळीत होण्यासाठी हा बाह्यवळण रस्ता खूप फायदेशीर ठरला तसेच पोलीसांचा वाहतूक ताण कमी झाला त्यांना इतर ठिकाणी लक्ष केंद्रित करून यात्रा सुखरुपणे पार पडली.

भास्करराव कवाद, पोलिस मित्र

# उपेक्षितांसाठी मार्गदर्शकाची भूमिका बजवावी

## कॅटायन कोचिंग क्लासला नानजीभाई ठक्कर यांची भेट

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**ग्रामीण भागातही अनेक गुणवान व विद्वान विद्यार्थी असून मुलांना डॉक्टर इंजिनियर होण्यासाठी मार्ग दाखवण्याची गरज आहे. त्यामुळे भविष्यात कॅटायन कोचिंग क्लासने बहुजन व उपेक्षित समाजातील मुलांसाठी मार्गदर्शकाची भूमिका बजावावी असे आवाहन एन.के. टी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई ठक्कर ठाणेवाला यांनी केले आहे.**



टाकळी ढोकेश्वर येथील स्वर्ग सिटीमध्ये असलेल्या कॅटायन कोचिंग क्लासला नानजीभाई ठक्कर यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी वसंत बुचडे, अशोक ठुबे सर, प्रा. भाई हनुमंत भागवत, श्याम गुंजाळ यांच्यासह शिक्षक वृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संघर्षाबरोबर संस्कार जतन करा

विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये संघर्ष करण्याची तयारी ठेवावी. परंतु शिक्षण आणि पदवी घेत असताना आई-वडिलांचे संस्कार जतन करण्याचे काम सुद्धा महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. प्रसन्ना वाळुंज व त्यांच्या सहकाऱ्यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे सोयी सुविधा उपलब्ध करून एक चांगले व आदर्श पाऊल उचलले आहे. या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थी निश्चित घडेल व एक प्रकारे ही ईश्वराची शक्ती भक्ती ठरेल अशा आशावाद वाटतो.

नानजीभाई ठक्कर ठाणेवाला
समाजसेवक

# कविता ठाणगे-तांबे यांचा तिखोलकरांनी केला सन्मान

## ■ पोलीस उपनिरीक्षकपदी निवड ■ संघर्षातून मिळविले यश

तिखोल : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील तिखोल गावांमध्ये, सन्मान भूमिपुत्रांचा अभिमान तिखोलकरांचा या कार्यक्रमानिमित्ताने गावातील यशस्वी विद्यार्थ्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.**

तिखोल गावाच्या असलेल्या कविता ठाणगे-तांबे यांनी एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण होऊन पोलीस उपनिरीक्षकपदी नुकतीच निवड झाली तसेच अभिजीत राघू ठाणगे, अभिषेक राघू ठाणगे, अभिजीत अशोक वाळेकर व सिद्धांत सतीश कावरे यांनी एमबीबीएस पूर्ण करून डॉक्टरेट पदवी मिळवली. या यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळ्या निमित्ताने कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थित म्हणून यशस्वीतेचा सुवर्णमंत्र या पुस्तकाचे लेखक ज्येष्ठ मार्गदर्शक एन. बी. धुमाळ होते.अध्यक्षस्थानी रयत शिक्षण




संस्थेचे सल्लागार ज्ञानदेव पांडुळे होते.

यावेळी डॉ. रवींद्र ठाणगे, प्रा. किसन पायमोडे, संपत वाळुंज, संतोष पोटे, प्रवीण तांबे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक नागनाथ शेटे, माजी सरपंच संगीता ठाणगे, तिखोल सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी ठाणगे, माजी चेअरमन नबाजी ठाणगे, संदीप ठाणगे, मा. सरपंच सुभाष ठाणगे, संकेत ठाणगे, बाळासाहेब ठाणगे, शिवाजी ठाणगे, महेश ठाणगे, अशोक ठाणगे, अश्विन मंचरे, अमोल साळवे, रोहित ठाणगे, नागचंद ठाणगे, नाबाजी मंचरे, सखाराम मंचरे, सतीश मंचरे, बाळु ठाणगे, अतुल ठाणगे, मेजर संतोष ठाणगे, कुमार ठाणगे, मेजर संजय ठाणगे, मेजर योगेश ठाणगे, गणेश ठाणगे, मेजर सुनील ठाणगे, दत्तात्रय ठाणगे, मेजर सागर ननवरे, किरण कुरकुटे, आदी ग्रामस्थ व मान्यवर यावेळी उपस्थित होते.

### कविता ठाणगे यांनी तिखोलकरांची मान उंचवली..

सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेतला परंतु जीवनात संघर्ष करण्याची आणि लढण्याचे शिकवण आई-वडिलांकडून मिळाल्याने प्रत्येक टप्प्यावर लढत आणि संघर्ष करत एमपीएससीच्या माध्यमातून अभ्यास करून तिखोल गावातील आणि आपल्या कुटुंबातील पोलीस उपनिरीक्षक होण्याचा पहिला बहुमान मिळविला त्यामुळे तिखोलकरांची मान आता तालुक्यात आणि जिल्ह्यात उंचावली गेली आहे.

### शिक्षणाच्या आड गरीबी येत नाही

पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत पोहचण्यासाठी सुरवातीच्या काळात आई वडीलांनी कष्टातुन दिलेले शिक्षण आणि पुढे पतींनी दिलेली साथ महत्त्वपूर्ण ठरली. कुठलीही शिकवणी न लावता घरी लहान बाळ देखील असताना या यशापर्यंत पोहचताना ठाणगे, तांबे परिवाराचे योगदान अमुल्य आहे. मुलांनी शिक्षण घेताना जिद्द संयम ठेवावा आणि गरीबी शिक्षणाच्या आड कधीही येत नाही.

कविता ठाणगे-तांबे, पोलीस उपनिरीक्षक

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com